लोकमत

# कोंकणी भाषेच्या विकासात मनोहरराय सरदेसाईंचे योगदान

## ज्येष्ठ साहित्यिक उदय भेंब्रे : साखळी सरकारी महाविद्यालयात जन्मशताब्दीनिमित्त राष्ट्रीय परिसंवादाला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**साखळी :** 'मनोहरराय सरदेसाई यांनी आपल्या बहुमूल्य योगदानाने कोंकणी भाषेला समृद्ध केले. कोंकणी चळवळ, शिक्षण तसेच साहित्य क्षेत्रात त्यांनी ऐतिहासिक कामगिरी केली' असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक उदय भेंब्रे यांनी केले.



परिसंवादाच्या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित साहित्यिक उदय भेंब्रे, गोवा कोंकणी अकादमीचे अध्यक्ष वसंत सावंत, प्राचार्य डॉ. नामदेव गावस, के. श्रीनिवासराव व मान्यवर.

साखळीतील कला, विज्ञान आणि वाणिज्य सरकारी महाविद्यालयाचा कोंकणी विभाग, गोवा कोंकणी अकादमी, राजभाषा संचालनालय आणि साहित्य अकादमीच्या संयुक्त विद्यमानाने मनोहरराय सरदेसाई यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित 'मनोहरराय सरदेसाई जीवन आणि कार्य' या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादाच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते. गोवा कोंकणी अकादमीचे अध्यक्ष वसंत सावंत, प्राचार्य डॉ. नामदेव गावस, साहित्य अकादमी नवी दिल्लीचे सचिव के. श्रीनिवासराव, साहित्य अकादमीच्या कोंकणी सल्लागार मंडळाचे निमंत्रक मेल्विन रॉड्रिग्स, साहित्य अकादमीच्या मुंबई प्रादेशिक कार्यालयाचे प्रभारी अधिकारी ओम प्रकाश नागर, सचिव पराग नगर्सेकार, सुनील सरदेसाई उपस्थित होते. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षपदी मेल्विन रॉड्रिग्स होते. ओम प्रकाश नागर यांनी आभार मानले. समारोप सोहळ्यास कवी दशरथ परब उपस्थित होते. हेन्री मेंडोण्सा यांनी टिप्पण सादर केले. सुरयना गावकर यांनी सूत्रसंचालन केले. उर्वशी नाईक यांनी आभार मानले. सरदेसाईंच्या साहित्यात जनसामान्यांची वेदना दिसते असे मत के. श्रीनिवासराव यांनी व्यक्त केले. पूर्णानंद च्यारी यांच्या अध्यक्षतेखालील सत्रात सोनिया सिरसाट, डॉ. राजय पवार आणि नंतरच्या सत्रांत हेन्री मेंडोन्सा, उमेश सरदेसाई, डॉ. पांडुरंग फळदेसाई, लुईस गोमीश यांनी शोधनिबंध सादर केले.